महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक - ४४८९ दिनांक :- ११ नोव्हेंबर, २०२२

## प्रसिद्धीपत्रक

वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प

# प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमध्ये ३२२ पात्र गाळेधारकांच्या सदनिकांची १४ नोव्हेंबर रोजी होणार निश्चिती

मुंबई, दि. ११ नोव्हेंबर, २०२२ - म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे वरळी बीडीडी चाळीतील इमारत क्रमांक ३२, ३३, ३९, ४० व सावली इमारतीमधील ३२२ पात्र गाळेधारकांना पुनर्विकासाअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्विकास इमारतीमध्ये यादृच्छिक (Randomised Allotment Tenement) पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे सदनिकांचा क्रमांक निश्चितीचा कार्यक्रम सोमवार, दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रम वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयातील गुलझारीलाल नंदा सभागृहात होणार आहे. सदनिका निश्चितीच्या कार्यक्रमासाठी उच्च स्तरीय देखरेख समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या उपस्थितीमध्ये निश्चितीचा कार्यक्रम होणार आहे. या सदनिका निश्चितीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी संबंधित चाळींमधील प्रथम येणाऱ्या ५ सदस्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या गाळेधारकांनी संबंधित चाळीमधील गाळेधारक असल्याबाबत पुरावा सादर करणे आवश्यक आहे, असे आवाहन मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे करण्यात आले आहे.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण


D:\Documents\Press Release\BDD worli rehab builiding lottery.docx